**आजचे पंचांग**

२२ जून २०२६, सोमवार
वार: सोमवार माह: ज्येष्ठ (अमावस्यांत) तिथी: शुक्ल पक्ष, अष्टमी (दुपारी ०३:३९ पर्यंत) शुभ आणि अशुभ वेळा (पुणे) राहुकाळ: सकाळी ०७:२३ ते ०९:०४ पर्यंत अमृत काळ: उपलब्ध नाहीअभिजीत मुहूर्त: दुपारी १२:०० ते १२:५२ पर्यंत

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

**कुटुंब नियोजनाचा भार महिलांवरच**

**पुणे :** कुटुंब नियोजनासाठी पुरुषांची नसबंदी ही महिलांच्या तुलनेत अधिक सोपी, सुरक्षित आणि कमी एकूण शस्त्रक्रियांमध्ये महिलांचे प्रमाण ९७.७० टक्के, तर पुरुषांचे प्रमाण अवघे २.३० टक्के इतके आहे.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, २३ जून २०२६ | वर्ष - १ | अंक -२६८ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

# ‘पुरोगामी महाराष्ट्र पाण्यासाठी कारणे देऊ शकत नाही’

## पाणीटंचाईवरून उच्च न्यायालयाने राज्य सरकारला खडसावले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई / छत्रपती संभाजीनगर :** मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्यातील पिण्याच्या पाण्याच्या संकटावरून राज्य सरकार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि महापालिका यंत्रणांना तीव्र शब्दांत खडसावले आहे. पुरोगामी राज्यात नागरिकांना मूलभूत पिण्याचे पाणी देता येत नाही, यासाठी प्रशासकीय कारणे चालणार नाहीत, अशी नाराजी न्यायालयाने व्यक्त केली.



छत्रपती संभाजीनगरच्या नव्या पाणीपुरवठा योजनेत सलग अडथळे येत आहेत. न्यायालयाने दिलेली १२ जूनची पाणीपुरवठा सुरू करण्याची डेडलाइन अधिकाऱ्यांना पाळता आली नाही. पैठण तालुक्यातील जयकवाडी कॉलनीजवळील स्मशानभूमीशेजारी २,५०० मिमी व्यासाच्या मुख्य पाइपलाइनचा स्कॉर व्हॉल्व फुटल्याने पहिल्याच दिवशी पुरवठा ठप्प झाला. यामुळे शहराला अपेक्षित २५ ते ३० एमएलडी पाणी मिळू शकले नाही.

हा एकटाच अडथळा नव्हता. ७ जून रोजी नक्षत्रवाडी जलशुद्धीकरण केंद्रात गळती झाल्याने कंत्राटदार ऋतझठ ला तीन दिवसांचा शटडाउन घ्यावा लागला होता. जयकवाडी धरणातील पाण्याची पातळी खालावल्याने सायफनमधून पाणी उचलण्यातही अडचण आली, त्यासाठी दोन व्हॅक्यूम पंप लावावे लागले.

न्यायालयाने यापूर्वीच शहरात दर चौथ्या आणि सातव्या दिवशी आलटून पालटून पाणीपुरवठा करण्याचा पायलट प्रकल्प राबवण्यास सांगितले होते, जेणेकरून प्रत्येक भागाला पंधरवड्यात अतिरिक्त पाणी मिळेल. खंडपीठाने कंत्राटदाराच्या संथ कामाबद्दल नाराजी व्यक्त केली होती आणि कंत्राट रद्द करण्याबाबत चगझ ला विचारणा केली होती.

राज्यभरातील स्थितीही गंभीर आहे. मुंबईतील सात जलाशय सध्या केवळ १०.३५% क्षमतेवर आहेत. भातसा ८.३%, तानसा ३.४६% इतकाच साठा शिल्लक आहे. यामुळे बीएमसीने १५ मे २०२६ पासून १०% पाणीकपात लागू केली आहे, आणि सध्याच्या साठ्यावर १७ ऑगस्टपर्यंत पुरवठा करता येईल, असे आयुक्तांनी स्पष्ट केले आहे. श्च

पाणी वाचवण्यासाठी बीएमसी आणि नवी मुंबई महापालिकेने बांधकाम, स्विमिंग पूल, कार वॉश सेंटर आणि पॅकेज्ड पाणी प्रकल्पांना नगरपालिकेचे पिण्याचे पाणी देण्यास तात्पुरती बंदी घातली आहे. औद्योगिक आणि व्यावसायिक आस्थापनांवर २०% कपात लागू आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २१ जून रोजी सांगितले की, राज्यातील पाणीसाठा गेल्या वर्षीपेक्षा कमी आहे, आणि पावसाळा सुधारेपर्यंत काटकसरीने व्यवस्थापन करण्याची गरज आहे.

न्यायालयाने **MJP** आणि महापालिकेला दुरुस्ती युद्धपातळीवर पूर्ण करून, पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक काटेकोरपणे पाळण्याचे आणि पुढील सुनावणीत प्रगती अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहे

# ८ दिवसांत पाऊस महाराष्ट्र व्यापणार !

## मान्सून सक्रिय, अरबी समुद्रातील वारे बळकट



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** अल-निनोचे अडथळे पार करत अखेर सोमवारी (२२ जून) सकाळी मान्सून पुणे शहरात दाखल झाला. यंदा तो नियोजित तारखेपेक्षा तब्बल १५ दिवस उशिरा आला. मान्सूनचा वेग पाहता आगामी ४८ तासांत तो मुंबईत पोहचेल, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने दिला आहे. राज्यात पुढील आठ दिवस मुसधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

गेले पंधरा दिवस मान्सून बारामती, हरणाई, सोलापूर भागात थबकलेला होता. मात्र, रविवारी (दि. २१) तो हवेचे दाब अनुकूल होताच सक्रिय झाला. त्यामुळे पुणे जिल्ह्यासह राज्याच्या बहुतांश भागात जोरदार पाऊस झाला. सोमवारी सकाळीच मान्सून पुण्यात दाखल झाल्याची अधिकृत घोषणा हवामान विभागाने केली. तसेच, मुंबईत आगामी ४८ तासांत तो धडकणार असल्याचा अंदाज दिला. त्यामुळे आता राज्यात तो जोरदार मुसंडी मारणार आहे. मात्र, जूनची सरासरी भरून काढण्यास जुलै उजाडणार आहे. मान्सूनची रेषा पुणे, अलिबाग, तेलंगणा, कर्नाटक, छत्तीसगड, निजामाबाद, दंतेवाडा, बालंगीर, सुंदरगड, चतरा, गया, मुझफ्फर, बिहार, ओडिशा या भागातून जात आहे. लवकरच काही तासांत मुंबईसह महाराष्ट्राचा आणखी काही भाग व्यापणार आहे. अरबी समुद्रातील वारे कमकुवत होते, त्यामुळे बाष्पयुक्त वाऱ्यांचा प्रभाव क्षीण होता. तसेच, हवेचे दाब अनुकूल नव्हते. आता ते वारे बळकट झाले. हवेचे दाब अनुकूल झाल्याने मान्सून वारे सक्रिय झाले, ताशी वेग ५० ते ६० कि.मी. वेगाने अरबी समुद्रातून बाष्पयुक्त वाऱ्यांचा प्रभाव वाढला. त्यामुळे कोकण, पुणे, पश्चिम महाराष्ट्रात ढग आणि पावसाची सक्रियता वाढली. याचा परिणाम म्हणून पुणे, मुंबई, ठाणे, रायगड, पालघरमध्ये मान्सून जोरदार सक्रिय होत आहे. आता विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रात प्रगतीची चिन्हे दिसत आहेत, मात्र जूनमधील तूट भरून निघणे कठीण आहे, त्यासाठी जुलै उजाडावा लागणार.

# पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या मुख्यालयासाठी ताथवडेतील २० हेक्टर जमीन हस्तांतरित होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे मुख्यालय, परेड ग्राऊंड तसेच इतर अनुषंगिक कार्यालयांच्या उभारणीसाठी ताथवडे (ता. मुळशी) येथील पशुसंवर्धन विभागाच्या अधिपत्याखालील २० हेक्टर जमीन हस्तांतरित करण्याच्या प्रस्तावाला महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अंतिम मंजुरीनंतर येत्या दोन ते तीन दिवसांत यासंदर्भातील शासन निर्णय (जीआर) जारी करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.




गृह विभागाने सादर केलेल्या प्रस्तावाला १० ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत तत्त्वतः मंजुरी देण्यात आली होती. त्यानुसार ताथवडे येथील वळूभाता प्रक्षेत्रातील एकूण ६७ हेक्टर ९४ आर क्षेत्रापैकी २० हेक्टर जमीन पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या मुख्यालयासाठी, परेड ग्राऊंड तसेच इतर संबंधित प्रशासकीय कार्यालयांच्या उभारणीसाठी हस्तांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

या निर्णयामुळे पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाला स्वतंत्र आणि प्रशस्त मुख्यालय उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आधुनिक सुविधा असलेले मुख्यालय, परेड ग्राऊंड आणि विविध विभागांची कार्यालये एकाच ठिकाणी उभारली जाणार असल्याने पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेत वाढ होण्यास मदत होणार आहे.

# कोचिंग सेंटरला भीषण आग, १४ मुलांचा होरपळून मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लखनऊ :** उत्तर प्रदेशची राजधानी लखनऊमधील अलीगंज भागात एक धक्कादायक घटना घडली आहे. येथील पुरनिया चौकाजवळील एका कोचिंग सेंटरला भीषण आग लागली. या भीषण दुर्घटनेत १४ मुलांचा होरपळून मृत्यू झाला आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या प्रकरणाच्या उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मृतांच्या कुटुंबियांसाठी आर्थिक मदत जाहीर केली आहे.

उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री ब्रिजेश पाठक यांनी या घटनेत किमान १४ जणांचा मृत्यू झाल्याची पुष्टी केली आहे.




मृत पावलेल्यांमध्ये बहुतांश तरुण मुला-मुलींचा समावेश असल्याचे समजते, जे आग लागली तेव्हा इमारतीमध्ये उपस्थित होते. धुराच्या साम्राज्यामुळे इमारतीत नेमके किती लोक अडकले आहेत, याबाबत बराच वेळ संभ्रम होता. आग लागताच संपूर्ण इमारतीत वेगाने धूर पसरला. हे पाहून स्थानिक लोकांनी तातडीने अग्निशामक दलाशी संपर्क साधला. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, आगीने बघता बघता विक्राळ रूप धारण केले होते. दुर्घटना घडली तेव्हा कोचिंग सेंटरमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. आगीच्या ज्वाळा आणि धूर पसरताना पाहून विद्यार्थ्यांमध्ये एकच पळापळ झाली. सर्वत्र किंचाळ्या आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लखनऊमधील या आगीच्या घटनेत झालेल्या जीवितहानीबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले असून, मृतांच्या कुटुंबियांना आणि जखमींना आर्थिक मदत जाहीर केली आहे. प्रत्येक मृत व्यक्तीच्या नातेवाईकाला २ लाख रुपये, तर जखमींना ५० हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे.

# OpenAI चे माजी संशोधक शामल अनादकत भारतात परतले; जागतिक दर्जाची AI संस्था उभारण्याची ‘सुवर्ण संधी’ असल्याचे मत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे/सॅन फ्रान्सिस्को :** कृत्रिम बुद्धिमत्ता **(AI)** क्षेत्रातील वेगवान घडामोडींच्या पार्श्वभूमीवर, डहरारश्र अपरवज्ञरीं यांनी सिलिकॉन व्हॅली सोडून भारतात परतण्याचा निर्णय घेतला आहे. जवळपास चार वर्षे **OpenAI** मधील **Applied Evals** टीमचे नेतृत्व केल्यानंतर त्यांनी भारताच्या वाढत्या तंत्रज्ञान परिसंस्थेत योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

अनादकत यांच्या मते, सध्या सुरू असलेली **AI** आणि सुपरइंटेलिजन्सची लाट ही पारंपारिक तंत्रज्ञान केंद्रांच्या बाहेर जागतिक दर्जाच्या संस्था उभारण्यासाठी एक ऐतिहासिक संधी आहे. त्यांनी नमूद केले की, भारताकडे प्रतिभेची कमतरता नाही; मात्र, भारतातूनही जागतिक स्तरावरील तंत्रज्ञान कंपन्या उभारता येतात, या विश्वासाचा अभाव ही मोठी अडचण राहिली आहे.

भारत आणि आशिया-पॅसिफिक **(APAC)** प्रदेशातील




संशोधक व अभियंत्यांशी संवाद साधताना त्यांना स्थानिक तरुणांमध्ये तंत्रज्ञानाचे भविष्य घडवण्याची तीव्र महत्त्वाकांक्षा दिसून आली. हीच ऊर्जा भारताला जागतिक **AI** नकाशावर अधिक प्रभावी स्थान मिळवून देऊ शकते, असे त्यांनी म्हटले आहे.

भारताशी असलेल्या भावनिक नात्याचाही त्यांच्या निर्णयामागे महत्त्वाचा वाटा असल्याचे सांगितले जाते. भारतात वाढल्यामुळे येथील तंत्रज्ञान क्षेत्राशी त्यांचे विशेष नाते असून, त्याला जागतिक स्तरावर नेण्याची त्यांची इच्छा आहे.

सध्या अनादकत भारतातूनच एका नव्या अख स्टार्टअपवर गुप्त **(Stealth Mode)** स्वरूपात काम करत आहेत. तज्ज्ञांच्या मते, त्यांचा हा निर्णय भारताच्या अख स्वायत्ततेला **(AI Sovereignty)** बळ देणारा ठरू शकतो. तसेच परदेशात अनुभव मिळवलेल्या भारतीय तंत्रज्ञान तज्ज्ञांच्या मायदेशी पुनरागमनाच्या वाढत्या प्रवाहाचे हे एक महत्त्वपूर्ण उदाहरण मानले जात आहे. **AI** क्षेत्रातील वाढती गुंतवणूक, संशोधन क्षमता आणि कुशल मनुष्यबळ यांच्या बळावर भारत जागतिक **AI** केंद्र म्हणून उदयास येण्याच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे संकेत या घडामोडीतून मिळत आहेत.

# विजेच्या धक्क्याने तरुण शेतकऱ्याचा मृत्यू; महावितरणच्या निष्काळजीपणाचा आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**केडगाव :** धुमळीचा मळा (ता. दौंड) येथील २५ वर्षीय तरुण शेतकरी यश गणेश जगताप याचा २२ तारखेला शेतात औषध फवारणीसाठी गेल्यानंतर विजेचा धक्का लागून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेनंतर संपूर्ण केडगाव परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे.

स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांच्या मते, संबंधित ठिकाणी वीजवाहिनीची तार सुमारे एक महिन्यापासून जमिनीवर कोसळलेली होती. याबाबत महावितरणला वारंवार दूरध्वनीद्वारे तसेच प्रत्यक्ष माहिती देण्यात आली होती. मात्र, याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याच निष्काळजीपणामुळे यश जगताप याचा बळी गेल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. घटनेनंतर मृत यश जगताप यांचे नातेवाईक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने केडगाव पोलीस चौकीसमोर जमा झाले. संबंधित महावितरण अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा तसेच मृताच्या कुटुंबीयांना तातडीने आर्थिक मदत व योग्य नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. यावेळी पोलीस चौकी परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. मात्र, स्थानिक नागरिक, मान्यवर आणि पोलिसांनी मध्यस्थी केल्याने परिस्थिती नियंत्रणात आली. संबंधित मागण्यांबाबत प्रशासनाकडून योग्य कारवाईचे आश्वासन देण्यात आल्यानंतर जमाव शांत झाला. दरम्यान, मेहनती व मनमिळावू स्वभावामुळे यश जगताप हा परिसरात परिचित होता. त्याच्या अकाली निधनामुळे धुमळीचा मळा तसेच संपूर्ण केडगाव परिसरावर शोककळा पसरली असून अनेकांनी या घटनेबाबत दुःख व्यक्त केले आहे.

# माजी अग्निवीरांना सरकारी नोकऱ्यांमध्ये २० टक्के आरक्षण मिळणार; मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अहमदाबाद :** गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी राज्यातील वर्ग-३ च्या विविध थेट सरकारी नोकरभरतीमध्ये माजी अग्निवीरांना २० टक्के आरक्षण देण्यात येणार असल्याची घोषणा केली. यासोबतच त्यांना वयोमर्यादेत सूट आणि शारीरिक चाचणीतून सूटही दिली जाईल.

राज्य पोलीस दलाची सशस्त्र शाखा, स्टेट रिझर्व्ह पोलीस, कारागृह आणि वन विभागामध्ये नोकरी मिळवू इच्छिणाऱ्या माजी अग्निवीरांना या निर्णयाचा मोठा फायदा होणार असल्याचे एका अधिकृत पत्रकात म्हटले आहे.

या भरती प्रक्रियेत आरक्षणाच्या फायद्यासोबतच, माजी अग्निवीरांना निश्चित करण्यात आलेल्या शारीरिक क्षमता चाचणीतून पूर्णपणे सूट देण्यात आली आहे. याशिवाय, मुख्यमंत्र्यांच्या निर्णयानुसार या भरतीसाठीच्या कमाल वयोमर्यादेत माजी अग्निवीरांना ३ वर्षांपर्यंतची सूट दिली जाईल. तर, अग्निपथ योजनेअंतर्गत भरती झालेल्या पहिल्या बॅचच्या उमेदवारांना वयोमर्यादेत ५ वर्षांपर्यंतची सूट मिळण्यास पात्र असणार आहेत, असेही या पत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

# पक्षांतरबंदी कायदा आणि लोकशाहीवरील प्रश्नचिन्ह : वारंवार घडणाऱ्या पक्षफुटींमुळे घटनात्मक सुधारणांची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशातील अलीकडील राजकीय घडामोडींमुळे पक्षांतरबंदी कायदा **(Anti-Defection Law)** पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. तृणमूल काँग्रेस (टीएमसी), शिवसेना आणि इतर काही राज्यांतील पक्षफुटीच्या घटनांनंतर अनेक घटनातज्ज्ञांनी दहाव्या अनुसूचीच्या प्रभावीतेवर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांच्या मते, १९८५ मध्ये ५२ व्या घटनादुरुस्तीमधून आणलेला हा कायदा राजकीय स्थैर्य निर्माण करण्यासाठी तयार करण्यात आला होता; मात्र कालांतराने त्यातील काही तरतुदींचा वापर सत्तासमीकरणे बदलण्यासाठी केला जात असल्याचे दिसून येते.

भारतीय संविधानाच्या दहाव्या अनुसूचीनुसार, एखादा आमदार किंवा खासदार स्वेच्छेने पक्षाचे सदस्यत्व सोडल्यास किंवा पक्षाच्या व्हिपच्या विरोधात मतदान केल्यास त्याला अपात्र ठरवले जाऊ शकते. तथापि, दोन-तृतीयांश सदस्यांनी एकत्रितपणे दुसऱ्या पक्षात विलीन होण्याचा निर्णय घेतल्यास त्याला कायदेशीर संरक्षण मिळते. याच तरतुदीचा अनेक राजकीय घटनांमध्ये आधार घेतला गेला आहे. घटनातज्ज्ञांचे म्हणणे आहे की मतदार एखाद्या उमेदवारासोबतच त्याच्या पक्षाच्या धोरणांनाही मत देतात. त्यामुळे कार्यकाळाच्या मध्यात मोठ्या प्रमाणावर पक्षांतर झाल्यास मतदारांच्या मूळ जनादेशाचा अर्थ बदलतो. यामुळे प्रतिनिधिक लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांवर परिणाम होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त केली जाते. कायद्याच्या अंमलबजावणीबाबतही प्रश्न उपस्थित केले जातात. पक्षांतर प्रकरणांवर निर्णय घेण्याचा अधिकार विधानसभा किंवा लोकसभेच्या अध्यक्षांकडे असतो. सर्वोच्च न्यायालयाने **Kihoto Hollohan v. Zachillhu** प्रकरणात अध्यक्षांचा निर्णय न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या कक्षेत येतो असे स्पष्ट केले होते. तरीही निर्णयांमध्ये होणारा विलंब आणि कथित पक्षपात यावर सातत्याने टीका होत असते.

तसेच, **Subhash Desai v. Principal Secretary, Governor of Maharashtra** (शिवसेना प्रकरण) निकालात सर्वोच्च न्यायालयाने पक्षाची अधिकृत संघटनात्मक रचना आणि संविधान यांचे महत्त्व अधोरेखित केले. केवळ विधिमंडळातील संख्याबळ हा पक्षाच्या वैधतेचा एकमेव निकष ठरू शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

याच पार्श्वभूमीवर स्वतंत्र न्यायाधिकरणाद्वारे अपात्रतेचे निर्णय घेणे, पक्षांतर करणाऱ्यांना उर्वरित कार्यकाळात मंत्रीपदांपासून दूर ठेवणे आणि राजकीय पक्षांमध्ये अंतर्गत लोकशाही बंधनकारक करणे यांसारख्या सुधारणांच्या मागण्या पुन्हा जोर धरत आहेत. तज्ज्ञांच्या मते, पक्षांतरबंदी कायद्याचा मूळ उद्देश राजकीय स्थैर्य, मतदारांच्या जनादेशाचे संरक्षण आणि लोकशाहीवरील विश्वास कायम ठेवणेसाध्य करण्यासाठी व्यापक घटनात्मक पुनर्विचाराची आवश्यकता आहे.

## संपादकीय

### लग्नानंतर मुलगी परकी होते का? सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने बदललेला दृष्टिकोन

भारतीय समाजात मुलगी लग्नानंतर परकी होते ही धारणा दीर्घकाळ प्रचलित आहे. विवाहानंतर मुलगी पतीच्या कुटुंबाचा भाग बनते आणि माहेराशी तिचे नाते दुय्यम ठरते, अशी समजूत अनेक ठिकाणी अजूनही आढळते. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडील निर्णयाने या दृष्टिकोनावर पुनर्विचार करण्याची गरज अधोरेखित केली आहे.

२ जून २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयात स्पष्ट केले की केवळ विवाह झाला म्हणून मुलगी तिच्या आई-वडिलांच्या कुटुंबाची सदस्य राहात नाही, असे मानणे घटनात्मक तत्त्वांच्या विरोधात आहे. उत्तर प्रदेशातील कुलसुम निशा यांच्या प्रकरणात न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि आलोक अराधे यांच्या खंडपीठाने हा निकाल देत समानता आणि लिंगनिरपेक्ष न्यायाच्या मूल्यांना अधोरेखित केले.

हे प्रकरण सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत चालणाऱ्या रेशन दुकानाच्या वारसाहक्काशी संबंधित होते. कुलसुम निशा यांच्या आईच्या निधनानंतर त्यांनी दुकान स्वतःच्या नावावर हस्तांतरित करण्याची मागणी केली. मात्र, उत्तर प्रदेश सरकारच्या २०१९ च्या आदेशानुसार कुटुंब या व्याख्येत विवाहित मुलीचा समावेश नसल्याने त्यांचा अर्ज नाकारण्यात आला.

सर्वोच्च न्यायालयाने या गृहितकाला आव्हान दिले की विवाहानंतर मुलगी जन्मदात्या कुटुंबापासून वेगळी होते. न्यायालयाने विचारले की विवाहित मुलगा कुटुंबाचा सदस्य मानला जात असेल, तर विवाहित मुलीला का वगळले जाते? असा भेदभाव अनुच्छेद १४ आणि १५ मधील समानतेच्या तत्त्वांच्या विरोधात असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

न्यायालयाने सामाजिक वास्तवाचाही विचार केला. आज अनेक विवाहित मुली पालकांची आर्थिक जबाबदारी सांभाळतात किंवा त्यांच्या देखभालीत महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे केवळ विवाहाच्या आधारावर कुटुंबाशी असलेले नाते संपल्याचे मानणे वास्तवाशी सुसंगत नाही.

हा निर्णय महिलांच्या हक्कांबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या प्रगतिशील भूमिकेचा पुढचा टप्पा मानला जातो. २०२० मध्ये मुलींना हिंदू संयुक्त कुटुंबात जन्मतः समान वारसाहक्क असल्याचे स्पष्ट केल्यानंतर, न्यायालयाने विविध प्रकरणांत विवाहित मुलींना समान वागणूक देण्यावर भर दिला आहे.

या निकालाचे परिणाम रेशन दुकानांपुरते मर्यादित नसून सरकारी सेवा, अनुकंपा नियुक्त्या, सामाजिक सुरक्षा योजना आणि कौटुंबिक लाभांवरही होऊ शकतात. त्यामुळे प्रशासकीय निर्णयांमध्ये वैवाहिक स्थितीऐवजी व्यक्तीची वास्तविक परिस्थिती आणि कुटुंबाशी असलेले संबंध अधिक महत्त्वाचे ठरू शकतात.

तथापि, कायदेशीर बदलांपेक्षा सामाजिक मानसिकतेत बदल होण्यासाठी अधिक वेळ लागतो. अनेक कुटुंबांमध्ये आजही मुलींना वारसाहक्क आणि कौटुंबिक निर्णयांमध्ये दुय्यम स्थान दिले जाते. त्यामुळे या निर्णयाचे महत्त्व त्याच्या सामाजिक संदेशातही आहे.

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे कि विवाह हा मुलगी आणि तिच्या जन्मदात्या कुटुंबातील नातेसंबंध संपवणारा निकष नाही. लग्नानंतरही मुलगी कुटुंबाचा भाग राहते आणि तिचे अधिकार व नाते कायम राहतात. स्त्री-पुरुष समानतेच्या दिशेने हा निर्णय एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरतो.

# दोन मिनिटांचा उशिर एका वर्षाची मेहनत पाण्यात !

## निट परीक्षार्थीचा रडतानाचा व्हिडिओ व्हायरल, यंत्रणेच्या निष्ठुरतेवर प्रश्नचिन्ह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बीड :** नीट ही देशातील सर्वात मोठी वैद्यकीय प्रवेश परीक्षा. या परीक्षेसाठी लाखो विद्यार्थी दिवस-रात्र अभ्यास करतात. कष्टाच्या त्या एका क्षणाचे स्वप्न घेऊन ते परीक्षा केंद्रावर पोहोचतात. मात्र, एका परीक्षा केंद्रावरून आलेला एक व्हिडिओ अनेकांच्या मनाला भिडून गेला. या व्हायरल व्हिडिओमध्ये एक विद्यार्थिनी परीक्षा केंद्राच्या गेटवर उभी राहून धाय मोकलून रडताना दिसत आहे. तिचे एकच म्हणणे होते सर, फक्त दोन मिनिटे उशीर झाला, आत जाऊ द्या ना प्लीज...! पण या दोन मिनिटाच्या उशिरामुळे संपूर्ण वर्षाची मेहनत पाण्यात गेली.

सदर विद्यार्थिनी परीक्षा केंद्रावर अवघ्या काही मिनिटांच्या उशिराने पोहोचली होती. नियमांचे पालन करण्याच्या नावाखाली तेथील कर्मचाऱ्यांनी तिला आत प्रवेश देण्यास नकार दिला. लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणाऱ्या या परीक्षेची शिस्त महत्त्वाची आहे, यात दुमत नाही. परंतु, काही सेकंदांच्या किंवा मिनिटांच्या उशिरासाठी एका वर्षाची मेहनत आणि एका तरुणाईचे स्वप्न असे निर्दयपणे चिरडून टाकणे कितीपत योग्य आहे? हा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये ही विद्यार्थिनी परीक्षा केंद्राच्या लोखंडी गेटजवळ उभी राहून हात जोडून विनवणी करताना दिसत आहे. तिच्या डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहत आहेत. माझं अख्खं वर्ष वाया जाईल, मी खूप अभ्यास केला होता, असे म्हणत ती आत जाण्यासाठी पोलिसांची आणि कर्मचाऱ्यांची गयावया करत आहे. तिच्यासोबत असलेले पालक आणि नागरिक देखील तिला मदत करण्यासाठी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करत आहेत, पण सर्व प्रयत्न निष्फळ ठरले गेले. या घटनेनंतर सोशल मीडियावर संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. अनेकांनी असा प्रश्न विचारला आहे की, जर परीक्षा इतकी शिस्तबद्ध आहे, तर कधीकधी पेपर लीक होण्याच्या घटना कशा घडतात? त्यावेळी यंत्रणेची शिस्त कुठे असते? केवळ दोन मिनिटांच्या उशिरामुळे एखाद्या विद्यार्थ्याचे आयुष्यभराचे स्वप्न उद्ध्वस्त करणे योग्य आहे का? परीक्षा घेणाऱ्या संस्थेने, म्हणजेच एनटीएने आणि स्थानिक प्रशासनाने अशा परिस्थितीमध्ये थोडा मानवी दृष्टिकोन दाखवणे गरजेचे होते, असे अनेकांचे मत आहे. संबंधित यंत्रणेने थोडी सहानुभूती दाखवून, अशा प्रकारच्या आकस्मिक परिस्थितीत योग्य निर्णय घेण्याची क्षमता वाढवली पाहिजे, अन्यथा यामुळे विद्यार्थ्यांचे मानसिक खच्चीकरण होण्यास वेळ लागणार नाही.

## पुण्यातील भोंदू बाबा मिश्राची 'आरती' अन् 'पायधुणी'; अंधश्रद्धेच्या आड १७ वर्षे अत्याचारांचा थरार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** भोंदू बाबा अशोक खरात प्रकरण ताजे असतानाच पुण्यात आणखी एका भोंदू बाबाचा काळा चेहरा समोर आला आहे. स्वत:ला ईश्वराचा अवतार असल्याचा दावा करणाऱ्या राधामोहन मिश्रा याच्या अंधश्रद्धेच्या जाळ्यात अडकलेल्या एका उच्चशिक्षित तरुणीवर तब्बल १७ वर्षे लैंगिक अत्याचार झाल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. या प्रकरणात सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे, मिश्रा याची भक्तांकडून आरती केली जात होती, तसेच त्याचे पाय पाणी आणि दुधाने धुवून ते प्राशन केले जात असल्याचे व्हिडिओ आता व्हायरल झाले आहेत. खराडी पोलिसांनी राधामोहन मिश्रा (वय ५९, रा. उबाळेनगर, पुणे) याच्यासह त्याचा साथीदार स्वामी कंवल नयन (वय ५८) आणि अन्य सहा महिलांविरोधात गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित तरुणीच्या आई-वडिलांची मिश्रावर प्रचंड श्रद्धा होती. त्याचाच गैरफायदा घेत मिश्राने स्वत:ला दैवी शक्ती लाभलेला अवतार असल्याचे भासवत तरुणीला मानसिकदृष्ट्या जखडून ठेवले. तिचा सातत्याने शारीरिक आणि मानसिक छळ करण्यात आला. तिला स्वत:चे मूत्र पाजणे, मारहाण करणे, विजेचे शॉक देणे अशा अमानुष प्रकारांनाही सामोरे जावे लागल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. इतकेच नव्हे तर, पीडितेला तिच्या पतीपासून विभक्त होण्यास भाग पाडून तिची मालमत्ताही स्वत:च्या नावावर करून घेतल्याचे समोर आले आहे. कुटुंबीयांच्या नजरेत पीडितेला खोटे ठरवून मिश्रा अनेक वर्षे आपला प्रभाव टिकवून ठेवत होता.

दरम्यान, या प्रकरणानंतर सोशल मीडियावर काही व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत. या व्हिडिओंमध्ये मिश्रा याची भक्तांकडून आरती केली जात असल्याचे दिसून येत आहे. तसेच पाणी आणि दुधाने त्याचे पाय धुवून ते पाणी भक्तांकडून प्राशन केले जात असल्याचेही स्पष्टपणे दिसत आहे. या प्रकारामुळे अंधश्रद्धेच्या नावाखाली सुरू असलेल्या प्रकारांबाबत पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

अखेर १७ वर्षांच्या छळानंतर पीडितेने धाडस दाखवत दुसऱ्या राज्यातील आपल्या घरी जाऊन आई-वडिलांना संपूर्ण प्रकाराची माहिती दिली. त्यानंतर कुटुंबीयांच्याही डोळ्यांवरील श्रद्धेचा पडदा दूर झाला. पीडितेने पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

**पासवर्डमुळे तपासात अडथळे...**

पोलिसांनी मिश्राच्या आश्रमातून पेन ड्राईव्ह, हार्ड डिस्कसह विविध साहित्य जप्त केले आहे. मात्र, या उपकरणांना पासवर्ड असल्याने तपासात अडचणी निर्माण होत असल्याची माहिती समोर आली आहे. या उपकरणांमधून आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त केली जात आहे.

**भोंदू खरात सारखा प्रकार..**

भोंदू अशोक खरात याचे देखील पाद्यपूजा करतानाचे व्हिडिओ व्हायरल झाले होते. त्याप्रमाणे भोंदू राधामोहन मिश्रा याचे देखील भक्तांकडून पाणी आणि दुधाने पाय धुऊन प्रसाद म्हणून ते प्राशन करताना भक्तमंडळी दिसत आहे. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये भोंदू मिश्रा हा एका खाटेवर आडवा पसरला असून, भक्त त्याची पाद्यपूजा केल्यानंतर त्याच्या नावाची आरती करताना दिसत आहेत.

## LinkedIn वर 'PayPal' डायरेक्टर बनून गंडा; सांगवीत तरुणाची पाऊण लाखांची

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी - चिंचवड (सांगवी):** सोशल मीडियाच्या माध्यमातून नोकरीचे आमिष दाखवून सुशिक्षित तरुणांना लुटणाऱ्या सायबर भामट्यांनी आता थेट नामांकित 'पे-पाल' (PayPal) कंपनीच्या डायरेक्टरच्या नावाने फसवणूक केल्याचा प्रकार सांगवीत उघडकीस आला आहे. एका तरुणाला तब्बल १ लाख ७२ हजार २०० रुपयांचा ऑनलाईन गंडा घालण्यात आला आहे.

**फसवणुकीची मोडस ऑपरेंडी:** भामट्याने 'लिंक्डइन' (LinkedIn) या प्रोफेशनल सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पे-पाल कंपनीचा डायरेक्टर 'गौरव शर्मा' असल्याचे भासवून खोटे प्रोफाईल तयार केले. फिर्यादी तरुणाला चांगल्या जॉबचे आमिष दाखवून त्याचा विश्वास संपादन केला व एक खोटा इंटरव्यू देखील घेतला.

त्यानंतर, "कंपनीच्या डायरेक्टर मिटिंगसाठी भारतात यायचे आहे, तसेच सध्या फॅमिलीच्या उदरनिर्वाहासाठी पैशांची खूप गरज आहे" अशी भावनिक कारणे सांगून, आरोपीने करूर वैश्य बँकेच्या एका खात्यावर (कुमार एस. नावावर असलेले खाते) वेळावेळी तब्बल १,७२,२००/- रुपये ऑनलाईन पाठवण्यास भाग पाडले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तरुणाने पोलिसांत धाव घेतली.

**सायबर गुन्ह्याची नोंद :** सांगवी पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात 'गौरव शर्मा', व्हॉट्सअॅप नंबर ९०३०१८३३९६ चा धारक आणि बँक खातेधारक कुमार एस. यांच्या विरोधात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३१८(४), ३३६(२) आणि माहिती तंत्रज्ञान कायदा (IT Act) कलम ६६ (डी) नुसार गुन्हा दाखल केला आहे. पोनि नांदेकर या सायबर गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

## पिंपरी-चिंचवडच्या प्रलंबित महसूल व वनविभागीय प्रश्नांवर महसूल मंत्र्यांची बैठक

### २२ जून रोजी मंत्रालयात उच्चस्तरीय आढावा; आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी - चिंचवड :** पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासाशी संबंधित महसूल, वन विभाग, भूमी अभिलेख तसेच गावठाण हद्दीतील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांवर २२ जून रोजी मंत्रालयात उच्चस्तरीय बैठका होणार आहेत. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीत विविध प्रलंबित विषयांचा सविस्तर आढावा घेऊन आवश्यक निर्णय घेतले जाणार आहेत.

सकाळी ११ वाजता महसूल व वन विभागाशी संबंधित विषयांवर बैठक होणार असून वनविभागाशी संबंधित प्रश्न तसेच हिंजवडी ते नवी सांगवी नदी सुधार प्रकल्पाच्या अनुषंगाने खडकी, डुडुळगाव, चऱ्होली बुद्रुक आणि तळवडे येथील गावठाण हद्दीतील प्रश्नांवर चर्चा होणार आहे. सायंकाळी ५ वाजता महसूल विभागाच्या बैठकीत भूमी अभिलेख विभागातील पिंपरी-चिंचवड नवनगर कार्यालयाशी संबंधित प्रकरणे आणि विविध गावठाण हद्दीतील प्रलंबित विषयांचा आढावा घेतला जाणार आहे.



या बैठकींना आमदार महेश लांडगे, महसूल व वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी, पुणे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. शहरातील अनेक विकास प्रकल्प वन, महसूल, भूमी अभिलेख आणि प्रशासकीय प्रक्रियांमुळे रखडले आहेत. या पार्श्वभूमीवर सर्व विभागांना एकत्र आणून निर्णय प्रक्रियेला गती देण्यासाठी आमदार महेश लांडगे यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.

या बैठकीत प्रलंबित मंजुरी, प्रशासकीय अडथळे आणि विकासकामांबाबत स्पष्ट निर्देश दिले जाण्याची अपेक्षा असून शहरातील अनेक महत्त्वाचे प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## बांधकाम परवानगी विभागाची जबाबदारी सहशहर अभियंता मनोज सेठियांकडे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवड महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम यांनी २८ फेब्रुवारी रोजी सेवानिवृत्ती घेतल्यानंतर शहर अभियंता पद अद्याप रिक्त आहे. या पदाचे कामकाज तात्पुरत्या स्वरूपात मुख्य अभियंता प्रमोद ओंबासे तसेच सहशहर अभियंते मनोज सेठिया आणि सुनील भागवानी यांच्याकडे सोपवण्यात आले होते.



दरम्यान, सहशहर अभियंता सुनील भागवानी यांच्याकडे असलेले बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे कामकाज आता सहशहर अभियंता मनोज सेठिया यांच्याकडे वर्ग करण्यात आले आहे. तसेच महापालिकेच्या स्थापत्य विभागातील उपअभियंता सुदर्शन वहिकर यांना कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. या बदलांमुळे अभियांत्रिकी विभागाच्या कामकाजात अधिक सुसूत्रता येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## सरकारी जमिनी लाटणाऱ्यांना दणका! ७/१२ उताऱ्याबाबत राज्य सरकारचा मोठा निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** मुंढवा येथील शासकीय जमीन विक्री प्रकरणानंतर जाग आलेल्या राज्य शासनाने आता भाडेतत्त्वावर दिलेल्या शासकीय जमिनींच्या सात-बारा उताऱ्यावर कब्जेदार म्हणून केवळ महाराष्ट्र शासन हीच नोंद करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे भाडेतत्त्वावरील शासकीय जमिनीवर स्वतःचीच मालकी सांगणाऱ्या संस्था, कंपन्या, प्राधिकरणे आदींना दणका बसणार आहे. तसेच, शासकीय जमिनींची विक्री रोखणे शक्य होणार आहे.

महसूल विभागाने याबाबत परिपत्रक जारी केले असून, संपूर्ण राज्यात पुढील तीन महिने विशेष मोहीम अशा नोंदी तपासून, त्या कब्जेदार म्हणून महाराष्ट्र शासनाच्या नावावर करण्याचे निर्देश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत.

शासनाकडून अनेक व्यक्ती किंवा संस्थांना ३०, ९९ किंवा ९९९ वर्षांच्या दीर्घ मुदतीसाठी जमिनी भाडेकरारावर दिल्या जातात. मात्र, या जमिनींच्या कब्जेदार सदरी महाराष्ट्र शासनाच्या नावाऐवजी शासनाच्या परवानगीशिवाय भाडेपट्टा धारकांचीच नावे लागल्याचा धक्कादायक प्रकार निदर्शनास आला आहे.

तत्कालीन अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रितसर नोंदी न घेतल्याने, अनेक भाडेपट्टाधारक




या सरकारी जमिनी स्वतःच्याच मालकीच्या असल्याचे गृहीत धरत आहेत, ज्यातून अनेक न्यायालयीन प्रकरणे उद्भवत आहेत. हा खासगी मालकीचा खेळ मोडून काढण्यासाठी आता सरकारने थेट कारवाईचा बडगा उगारला असून, भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनींच्या अधिकार अभिलेखातील कब्जेदार सदरी आता केवळ महाराष्ट्र शासनाच्या नावाची नोंद असणे बंधनकारक केले आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंमलात येण्यापूर्वी कोणत्याही कायद्याखाली कायमस्वरुपी अथवा नूतनीकरणाचा पर्याय देऊन ५० वर्षांच्या मुदतीसाठी दिलेल्या भाडेपट्ट्यांना संहितेच्या कलम २९ (३) क नुसार भोगवटादार वर्ग-२ च्या तरतुदी लागू होतील. जिल्हाधिकाऱ्यांनी अशा भाडेपट्टा सदरी ३० दिवसांच्या आत भोगवटादार वर्ग-२ अशी नोंद घेऊन शासनाला अहवाल सादर करण्याचे स्पष्ट आदेश महसूल मंत्री बावनकुळे यांनी दिले आहेत.

## चिखलीत कोयत्याने रक्ताळलेला खेळ; भरचौकात दहशत माजवणारी टोळी गजाआड!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड (चिखली):** चिखली येथील साने चौक परिसरात पूर्ववैमनस्यातून एका तरुणावर कोयत्याने जीवघेणा हल्ला करण्यात आला आहे. एवढेच नव्हे, तर परिसरात कोयता हवेत फिरवून "समोर याल तर एकेकाला बघून घेईन," अशी धमकी देत नागरिकांमध्ये प्रचंड दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन सराईत आरोपींसह त्यांच्या साथीदारांना पोलिसांनी तत्परतेने अटक केली आहे.

फिर्यादी विनायक ऊर्फ बाबू राजू ननावरे (वय २४, रा. सुदर्शन नगर, चिखली) हा साने चौकातील भाजी मंडई रोडवरील एका गॅरेजजवळ थांबला असताना, आरोपींनी जुन्या भांडणाचा राग मनात धरून त्याच्यावर हल्ला केला. आरोपींनी विनायकच्या डोक्यावर आणि हातावर कोयत्याने सपासप वार करून त्याला गंभीर जखमी केले. तसेच त्याचा मित्र ऋत्विक कसाळकर यालाही जबर मारहाण केली. हल्ला केल्यानंतर आरोपींनी परिसरात कोयता उगारून लोकांना धमकावले, ज्यामुळे बाजारात एकच पळापळ झाली होती.

**पोलिसांची कारवाई आणि आरोपींची नावे:** घटनेची माहिती मिळताच चिखली पोलिसांनी गुन्हा दाखल करत आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. अटक केलेले आरोपी: १) सिद्धार्थ धारजे (वय २१ वर्ष, रा. निगडी, पुणे) २) शिवशंकर श्रीमंगल (वय २० वर्ष, रा. मेदणकरवाडी, चाकण) आणि त्यांचे दोन अनोळखी मित्र.

**दाखल गुन्हे:** भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १०९, ११५(२), ३(५) सह शस्त्र अधिनियम (आर्म्स ॲक्ट) आणि क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सपोनि गोमारे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## प्रभाग क्रमांक २५ मध्ये 'शासन आपल्या दारी' उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी चिंचवड :** प्रभाग क्रमांक २५ मधील नगरसेवक कुणाल वाव्हळकर यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या 'शासन आपल्या दारी' या जनहिताच्या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमाअंतर्गत नागरिकांना उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, आयुष्मान भारत कार्ड, रेशन कार्ड, पॅन कार्ड दुरुस्ती तसेच विविध शासकीय कागदपत्रे आणि योजनांचा लाभ मोफत उपलब्ध करून देण्यात आला.

शासनाच्या सेवा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत सुलभपणे पोहोचाव्यात आणि आवश्यक कागदपत्रांसाठी होणारी धावपळ कमी व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे




आयोजन करण्यात आले होते.

सकाळपासूनच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध शासकीय सेवांचा लाभ घेतला. शेकडो नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घेत समाधान व्यक्त केले.

यावेळी नगरसेवक धर्मपाल तंदरपाळे, युवा नेते चेतन भाऊ भुजबळ, लक्ष्मीदीप सोसायटीचे चेअरमन रामभाऊ गावंडे, सामाजिक कार्यकर्ते धनंजय कोयते, अमोल डोंगरे, योगेश भोसले, किरण समिंदर, अविनाश शिरसाठ, संतोष भेंगळे, रजनीकांत वावळकर, विशाल वावळकर, रोहित पारदे, प्रमोद शिंदे, आप्पा माने यांच्यासह अनेक मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

या उपक्रमामुळे नागरिकांना आवश्यक शासकीय कागदपत्रे आणि योजनांचा लाभ एकाच ठिकाणी मिळणे अधिक सुलभ झाले. नगरसेवक कुणाल वाव्हळकर यांच्या या उपक्रमाचे परिसरातील नागरिकांनी स्वागत करत समाधान व्यक्त केले.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### चाकणमध्ये गांजा विक्रीवर पोलिसांचा छापा; ३५८ ग्रॅम गांजासह दोघे जेरबंद, चौघे फरार

**चाकण :** चाकण परिसरात अंमली पदार्थांविरोधातील कारवाईदरम्यान चाकण उत्तर पोलिसांनी गांजा विक्री करणाऱ्या टोळीवर छापा टाकून दोघांना अटक केली आहे. आरोपींकडून ३५८ ग्रॅम गांजा आणि मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १९ जून रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास चाकण गाव हद्दीतील धाडगे मळा परिसरात लक्ष्मीपुत्र बंगल्याजवळ सापळा रचून कारवाई करण्यात आली. यावेळी अली साजीद सिकिलकर (वय २०) व संतोष कुमार मोहनलाल विश्वकर्मा (वय २६) यांना ताब्यात घेण्यात आले. तपासादरम्यान आरोपींकडून सुमारे १८ हजार १०० रुपये किमतीचा ३५८ ग्रॅम गांजा विक्रीसाठी बेकायदेशीररित्या बाळगल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी गांजासह मोटारसायकल जप्त केली आहे. या प्रकरणात निखिल उर्फ दादया कांबळे, सलमान इनामदार, संकेत कौटकर आणि प्रविण जाधव उर्फ बॉस हे चार संशयित फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. याप्रकरणी चाकण उत्तर पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक नरवडे करीत आहेत.

### 'भाऊ पोलिस आयुक्त असल्याचा' बनाव; सरकारी नोकरीच्या आमिषाने ज्येष्ठ नागरिकाची ११ लाखांची फसवणूक

**पुणे :** आपला सख्खा भाऊ पोलिस खात्यात आयुक्त पदावर असल्याची बतावणी करत रेल्वे आणि पोलिस दलात नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिकाची ११ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी महादेव सखाराम पवार (वय ६३, रा. येरवडा) यांनी येरवडा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार विन्सेंट जॉन मुनतोडे तळपलशपीं गेहप चींपींवश (वय ६०, रा. लोहगाव) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने पवार यांच्या मुलाला रेल्वे आणि पोलिस खात्यात शासकीय नोकरी लावून देण्याचे आश्वासन दिले होते. त्यासाठी पाच लाख रुपये रोख स्वरूपात, तर सहा लाख रुपये स्वतःच्या आणि पत्नीच्या बँक खात्यावर वर्ग करून घेतले. मात्र, बराच कालावधी उलटल्यानंतरही नोकरी मिळाली नाही आणि दिलेली रक्कम परत करण्यास आरोपीकडून टाळाटाळ केली जात असल्याने आपली फसवणूक झाल्याचे फिर्यादीच्या लक्षात आले. या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक अंजुम बागवान यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक कुंदन सत्रे करत आहेत.

# पुण्यात पोलीसांवर हल्ला करून पसार झालेला सराईत गुन्हेगार अखेर जेरबंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** बाणेर पोलिसांच्या पथकावर जीवघेणा हल्ला करून फरार झालेला सराईत गुन्हेगार बिंतुसिंग श्यामसिंग कल्याणी (वय ३०) याला गुन्हे शाखेच्या युनिट-५ आणि खंडणी विरोधी पथक-२च्या संयुक्त पथकाने थरारक पाठलाग करून अखेर जेरबंद केले.

त्याला पळून जाण्यास मदत केल्याप्रकरणी हसपालसिंग नेपालसिंग कल्याणी (वय ३५) आणि निहालसिंग रामजसिंग कल्याणी यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनूसार २१ जून रोजी बाणेर पोलिसांचे पथक घरफोडीच्या गुन्ह्यातील निष्पन्न आरोपींचा पाठलाग करत रामटेकडी, हडपसर येथे पोहोचले होते. त्यावेळी बिंतुसिंग कल्याणी आणि करणसिंग रजपुतसिंग दुधाणी हे दुचाकीवरून पळून जाण्याचा प्रयत्न करत होते.

बिंतुसिंगने पोलिसांच्या अंगावर दुचाकी घालण्याचा प्रयत्न केला, तर करणसिंगने धारदार शस्त्राने पोलिसांवर हल्ला केला. या हल्ल्यात सहायक पोलीस निरीक्षक गणेश रायकर जखमी झाले. त्यानंतर स्वसंरक्षणार्थ त्यांनी केलेल्या गोळीबारात करणसिंग दुधाणी जखमी झाला. मात्र, बिंतुसिंग तेथून फरार झाला होता. या



घटनेनंतर गुन्हे शाखेचे युनिट-५ आणि खंडणी विरोधी पथक-२ यांनी त्याचा समांतर शोध सुरू केला. दरम्यान, पोलीस हवालदार नितीन मुंढे, कानिफनाथ कारखिले आणि शशिकांत नाळे यांना गुप्त माहिती मिळाली की, बिंतुसिंग हा बोरीऐंदी (ता. हवेली) गावाच्या शिवारात लपून बसला असून पुणे जिल्ह्याबाहेर पसार होण्याच्या तयारीत आहे. पोलिसांनी दरेकरवाडी रोड, बोरीऐंदी येथे सापळा रचला. तेथे बिंतुसिंग एका व्यक्तीसह उभा असल्याचे दिसताच पोलिसांनी चारही बाजूंनी घेराव घालत पाठलाग करून त्याला पकडले. त्याच्यासोबत असलेल्या हसपालसिंग कल्याणी यालाही ताब्यात घेण्यात आले.

चौकशीत, हसपालसिंग कल्याणी आणि निहालसिंग रामजसिंग कल्याणी यांनी गुन्ह्याची माहिती असूनही बिंतुसिंगला लपवून ठेवत पळून जाण्यास मदत केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दोघांनाही ताब्यात घेण्यात आले असून तिन्ही आरोपींना पुढील कारवाईसाठी वानवडी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास वानवडी पोलीस करत आहेत.

**२५ गुन्ह्यांतील सराईत आरोपी**

पोलीस अभिलेखानुसार बिंतुसिंग श्यामसिंग कल्याणी याच्याविरुद्ध शरीराविरुद्धचे आणि मालमत्तेविरुद्धचे मिळून सुमारे २५ गुन्हे दाखल आहेत. तर हसपालसिंग कल्याणी याच्याविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा नोंद आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संजय दराडे, अतिरिक्त पोलीस आयुक्त (गुन्हे) तेजस्वी सातपुते, पोलीस उपायुक्त (गुन्हे) गौहर हसन, सहाय्यक पोलीस आयुक्त राजेंद्र मुळीक आणि शैलेश संख्ये यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत पोलीस निरीक्षक राम राजमाने, संदीपान पवार, पोलीस उपनिरीक्षक अभिजीत पवार, तसेच पोलीस अंमलदार शहाजी काळे, शशिकांत नाळे, प्रताप गायकवाड, विनोद शिवले, अकबर शेख, सुधीर सोनवणे, नासेर देशमुख, परमेश्वर कदम, नेत्रिका अडसुळ, तसेच खंडणी विरोधी पथक-२चे नितीन मुंढे, कानिफनाथ कारखिले, सुरेंद्र जगदाळे, अनिल कुसाळकर आणि पवन भोसले यांनी सहभाग घेतला.

## अबोली जरीत यांचा महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सन्मान



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** अबोली जरीत यांचा महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सन्मान पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नुकत्याच पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत राष्ट्रपती पदक विजेत्या सर्वश्रेष्ठ दिव्यांगजन तसेच इंडियन आयडॉल फेम अबोली जरीत यांचा सन्मान महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, क्रीडा, कला, साहित्य आणि सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे,माजी महापौर योगेश बहल,नगरसदस्य शत्रुघ्न काटे,अनिल घोलप, अर्चना करांडे, सुलभा उबाळे, प्रा. उत्तम केंदळे, माजी नगरसदस्या गिरीजा कुदळे, नगरसचिव मुकेश कोळप, उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आदी उपस्थित होते.

याप्रसंगी अबोली जरीत म्हणाल्या, आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने झालेल्या या सन्मानामुळे मला अत्यंत आनंद होत आहे. या शहरात येण्याची आणि येथील विविध उपक्रमांची माहिती जाणून घेण्याची संधी मिळाली, याचा मला विशेष आनंद आहे. पिंपरी चिंचवडमध्ये आल्यानंतर मला दिव्यांग भवनला भेट देण्याची संधी मिळाली. हे दिव्यांग भवन पाहून मी खरोखरच भारावून गेले. इतक्या सर्वसमावेशक पद्धतीने उभारण्यात आलेले आणि दिव्यांग बांधवांच्या गरजा लक्षात घेऊन विकसित करण्यात आलेले असे दिव्यांग भवन मी यापूर्वी कधीही पाहिले नव्हते. भारतातील पहिले दिव्यांग भवन पाहण्याचा अनुभव माझ्यासाठी अतिशय प्रेरणादायी ठरला,येथे आल्यावर मला असे अजिबात वाटले नाही की मी पहिल्यांदाच या शहरात आले आहे.

## शून्य कचरा संकलन उपक्रमाला नागरिकांचा मिळतोय उत्स्फूर्त प्रतिसाद!

### पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापनाला चालना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** कचरा व्यवस्थापनात नागरिकांच्या सहभागातून सकारात्मक बदल घडत असल्याचे चित्र पिंपरी चिंचवड शहरात दिसून येत आहे. महापालिकेच्या शून्य कचरा संकलन (झिरो वेस्ट स्लम) उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून गेल्या महिनाभरात ११.४७ टन कचऱ्याचे स्रोतस्तरावर विलगीकरण करण्यात आले आहे. या उपक्रमात १९ हजार ८०५ घरांनी सहभाग नोंदविला आहे.

महापालिकेच्या आकडेवारीनुसार, महिनाभरात कालावधीत ९.९७ टन ओला कचरा आणि १.५० टन सुका कचरा स्वतंत्रपणे संकलित करण्यात आला. याशिवाय, ६४३ किलो सॅनिटरी कचऱ्याचे सुरक्षित पद्धतीने




व्यवस्थापन करण्यात आले. कचऱ्याच्या वर्गीकरणामुळे पुनर्वापर आणि पुनर्निर्मिती प्रक्रियेला गती मिळत असून, पर्यावरणीय परिणाम कमी करण्यास मदत होत आहे.

कचरा डेपोवरील वाढता ताण कमी करण्यासाठी आणि पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापनाला चालना देण्यासाठी महापालिकेकडून शून्य कचरा संकल्पना राबविण्यात येत आहे. घराघरांत ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजीयोग्य कचरा वेगळा करण्याची सवय वाढत असल्याने कचऱ्याच्या वैज्ञानिक व्यवस्थापनाला बळ मिळत आहे.

याबाबत महापौर रवि लांडगे म्हणाले, शून्य कचरा संकलन उपक्रमाला मिळणारा नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद ही पिंपरी चिंचवडकरांच्या पर्यावरणाप्रती असलेल्या बांधिलकीची साक्ष आहे. स्रोतस्तरावर कचऱ्याचे विलगीकरण केल्यास कचऱ्याचे प्रमाण कमी होण्याबरोबरच पुनर्वापर आणि पुनर्निर्मितीलाही चालना मिळते. स्वच्छ, सुंदर आणि शाश्वत शहर घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने कचरा विलगीकरणाची सवय कायम ठेवावी. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आवाहन करताना सांगितले की, शहर स्वच्छ, सुंदर आणि शाश्वत ठेवण्यासाठी नागरिकांनी ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजीयोग्य कचरा अशा चार प्रकारांत कचरा विलगीकरणाची सवय कायम ठेवावी. नागरिकांचा वाढता सहभाग ही या उपक्रमाची जमेची बाजू ठरत असून, 'माझा कचरा, माझी जबाबदारी' ही संकल्पना अधिक बळकट होत आहे.

## ५०० रुपयांची बनावट नोट चालविण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघांना अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** टी स्टॉलवर सिगारेट विकत घेऊन ५०० रुपयांची नोट दिली. स्टॉलचालकाने नीट निरखुन पाहिल्यावर ती नोट बनावट असल्याचे लक्षात आले. कोरेगाव पार्क पोलिसांनी ५०० रुपयांची बनावट नोट वटविण्याचा प्रयत्न करणार्या दोघांना अटक केली आहे.

ओमप्रकाश महावीर अगरवाल (वय ३२, रा. श्री महालक्ष्मी निवास, टिंगरेनगर, विश्रांतवाडी) आणि मौसम नरेंद्र मिश्रा (वय ३६, रा. निंबाळकर कॉम्प्लेक्स, लोहगाव) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याबाबत सिद्धराम अशोक बिदनकर (वय २५, रा. महात्मा फुले वसाहत, ताडीवाला रोड) यांनी कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना ढोले पाटील रोडवरील रुबी हॉल क्लिनिकच्या एक्झीट गेटलगतच्या मल्हार टी शॉप आणि युनिक शॉपवर १९ जून रोजी दुपारी ३ वाजता घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचा टी स्टॉल आहे. शुक्रवारी दुपारी फिर्यादी यांची आई स्टॉलवर होती. ओमप्रकाश अगरवाल हा स्टॉलवर आला व त्याने सिगारेट विकत घेतली. आईकडे ५०० रुपयांची बनावट नोट दिली. अशाच प्रकारे त्यांच्या बाजूला असलेल्या युनिक शॉपवर मौसम मिश्रा याने ५०० रुपयांची बनावट नोट दिली होती.

ही नोट निरखुन पाहिल्यावर ती बनावट असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी तातडीने ११२ नंबर कॉल केला. त्यावरुन पोलीस तातडीने तेथे पोहचले. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले. सहायक पोलीस निरीक्षक जितेंद्र खैरनार तपास करीत आहेत.

## सायंटिफिक लँड फील साईटवर मिक्स कचरा प्लास्टिक चे प्रमाण देखील प्रचंड; ग्रामस्थांनी कचरा गाड्या अडविल्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**देवाची उरुळी :** येथील महापालिकेच्या कचरा डेपोच्या आवारातील सायंटिफिक लेंड फिलिंगच्या जागेत रिजेक्ट ऐवजी शहरातील विविध कचरा रॅम्पवरील मिक्स कचरा आणून टाकण्यात येत आहे. ग्रामस्थांच्या निदर्शनास ही बाब आल्यानंतर त्यांनी शनिवारी संध्याकाळ पासून येथे कचरा घेऊन येणाऱ्या गाड्या नुसत्या अडविल्या नाहीतर पोलिसांना बोलावून पंचनामा देखील करायला लावला आहे. यामुळे महापालिका प्रशासना समोरील अडचणी वाढल्या आहेत.

देवाची उरुळी येथील कचरा डेपोच्या आवारात सायंटिफिक लँड फिलिंग करण्यात येत आहे. याठिकाणी शहरातील कचरा प्रक्रिया प्रकल्पांमधील प्रक्रिया न होणारा कचरा अर्थात गाद्या, उश्या, लाकडी वस्तू, रेगझिन असा कचरा शास्त्रीय पद्धतीने जमिनीमध्ये पुरून त्यावर मातीने झाकण्यात येते. प्रक्रिया प्रकल्पांना देखील जेमतेम ५ टक्के रिजेक्ट बाजूला काढण्याचे बंधन असून उर्वरित कचऱ्यावर प्रक्रिया करणे बंधनकारक आहे.



लँड मे. आदर्श भारत एन्व्हायरो कंपनीकडे आहे.

दरम्यान काल कचरा डेपोत पाहणी करण्यासाठी गेलेल्या उरुळी ग्रामस्थांना या लॅन्ड फिलिंग साइटमध्ये ओला व सुका असा मिक्स कचरा आणून टाकण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तातडीने पोलिसांना बोलावून पंचनामा करून घेतला. तसेच डेपो मध्ये एकही गाडी कचरा आणू नये असे पालिकेच्या अधिकाऱ्यांना बजावले.

ग्रामस्थानी कचरा घेऊन आलेल्या वाहन चालकांकडून चलन घेतले. त्यामध्ये हा कचरा कोथरूड, वारजे, खराडी, कात्रज या परिसरातून आल्याचे व रिजेक्ट असल्याच्या नोंदी आहेत. यापैकी कोथरूड येथे कुठलाही प्रकल्प नाही. केवळ कचरा रॅम्प आहे. तिथे ओल्या सुक्या कचऱ्याचे विलगीकरण करून संबंधित प्रकल्पांना कचरा पाठवण्यात येतो. रॅम्प वरुण थेट कचरा येत असल्याने मिक्स कचरा आणला जात असल्यावर गावकऱ्यांचा संशय अधिकच बळावला आहे. एकाच ठेकेदाराकडे प्रक्रिया प्रकल्प , जळाऊ कचऱ्याची वाहतूक आणि लॉण्ड फिलिंगचे कामही असल्याने कचऱ्यावर कुठलीही प्रक्रिया न करता तो लँड फिलिंग साईट वर आणून महापालिकेची आणि ग्रामस्थांची आर्थिक फसवणूक तर केली जात नाही ना ? याचा तपास प्रशासनाने करावा. तोपर्यंत येथे एक गाडी देखील कचरा आणून दिला जाणार नाही असा इशारा ग्रामस्थानी दिला आहे.

याप्रकरणी अतिरिक्त आयुक्त प्रजीत नायर यांच्याशी संपर्क साधला असता, ते म्हणाले खराडी येथील प्रकल्प कामासाठी बंद आहे. तसेच काही प्रकल्पातील रिजेक्ट लँड फील साईटवर नेण्यात येत आहे. याठिकाणी मिक्स कचरा टाकला जात असेल तर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. अधिकाऱ्यांना पाहणी करण्यासाठी पाठवले आहे.

लँड फील साईटवर मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक देखील आहे. वास्तविकता प्लास्टिक कचऱ्याचा वापर सिमेंट कंपन्यांना आर डी एफ अर्थात इंधन म्हणून करण्यात येतो. याचा अर्थ शहरातील प्रक्रिया प्रकल्पात प्लास्टिक कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया होत नाही ?

हे प्लॅस्टिक थेट लँड फील साईटवर टाकण्यात येते का? यामध्ये महापालिकेच्या वाहन विभागाचा अंकुश नाही? असे अनेक प्रश्न यानिमित्ताने निर्माण झाले आहेत.

# भारतीय हौशी कबड्डी महासंघाच्या अध्यक्षपदी पुनीत बालन यांची बिनविरोध निवड; २०२६-३० कार्यकारिणीची घोषणा; देशभरातील २२ पदाधिकाऱ्यांची निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** भारतीय हौशी कबड्डी महासंघाच्या (अमेच्युअर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया – एकेएफआय) अध्यक्षपदी युवा उद्योजक पुनीत बालन यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या नव्या कार्यकारिणीत देशभरातील विविध राज्यांतील प्रतिनिधींना संधी देण्यात आली असून, एकूण २२ पदाधिकाऱ्यांची घोषणा करण्यात आली आहे. भारतीय हौशी कबड्डी महासंघाच्या २०२६ ते २०३० या कालावधीसाठीची निवडणूक रांची (झारखंड) याठिकाणी रविवारी पार पडली. या निवडणुकीसाठी महासंघाचे २२ राज्यातील प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्राचे क्रीडा प्रशासक तथा उद्योगपती पुनीत बालन यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. तर विदर्भातील माजी खासदार रामदास तडास यांची अध्यक्ष (प्रेसिडेंट एमेरिटस) म्हणून, तर बिहारचे राजकुमार सिंह यांची मुख्य संरक्षक (चीफ पॅट्रन) म्हणून निवड करण्यात आली आहे. तसेच सरचिटणीसपदी तेलंगणाच्या उशी रेड्डी यांची तसेच इतर महत्त्वाच्या पदांवर व कार्यकारिणीत देशातील विविध राज्यांतील प्रतिनिधींची बिनविरोध निवड करण्यात आली. उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती रत्नाकर भेंगरा यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले तर दिवाणी न्यायालयाचे सहायक निवडणूक अधिकारी, निवृत्त जिल्हा न्यायाधीश पंकज श्रीवास्तव यांच्या देखरेखीखाली ही निवडणूक झाली. यावेळी महासंघाचे अरुण सिंह, डॉ. राजेश गुप्ता, विवेक रेड्डी, राहुल सिंह, चेतन गोविंद झा, राजेश सिंह, मनोज शर्मा, कुणाल एम. त्रिपाठी, सम्मी सिंह, सुजल केशरी, प्रदीप तिर्की व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

नवनिर्वाचित अध्यक्ष पुनीत बालन यांची विविध क्रीडा उपक्रमांना सातत्याने पाठबळ देणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख असून, त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय कबड्डीला नवी दिशा आणि गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

> भारतीय हौशी कबड्डी महासंघाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी माझ्यावर सोपवल्याबद्दल देशभरातील सर्व राज्य संघटना आणि पदाधिकाऱ्यांचे मी मनः पूर्वक आभार मानतो. कबड्डी हा भारताचा पारंपरिक आणि जनमानसाशी जोडलेला खेळ आहे. या खेळाला जागतिक स्तरावर अधिक बळकट करण्यासाठी, ग्रामीण भागातील गुणवंत खेळाडूंना संधी उपलब्ध करून देण्यासाठी, आधुनिक प्रशिक्षण सुविधा उभारण्यासाठी आणि महिला तसेच युवा कबड्डीपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सर्व पदाधिकाऱ्यांना आणि राज्य संघटनांना सोबत घेऊन भारतीय कबड्डीच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणार असून, देशाला आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिकाधिक यश मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहू,
>
> – पुनीत बालन (नवनिर्वाचित अध्यक्ष)



## सारांश वृत्त

### बारामती तालुक्यातील ऑनलाइन 'बिंगो' जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; रोहित राम सातपुते आणि शेखर बाबूलाल पाटोळे यांना रंगेहाथ पकडलं

**पुणे** : करंजेपूल (ता. बारामती) येथील सोमेश्वर साखर कारखाना रस्त्यालगत सुरू असलेल्या ऑनलाइन 'बिंगो' जुगार अड्ड्यावर वडगाव निंबाळकर पोलिसांनी छापा टाकत दोन जणांना रंगेहाथ अटक केली. या कारवाईत सुमारे ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

रोहित राम सातपुते (वय २२) आणि शेखर बाबूलाल पाटोळे (वय ३५, दोघेही रा. करंजे, ता. बारामती) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. सगुना चिकन सेंटरच्या आडोशाला ऑनलाइन जुगार सुरू असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार वडगाव निंबाळकर पोलिसांच्या पथकाने अचानक छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत ६ हजार ९०० रुपयांची रोकड, मोबाईल फोन, एलईडी टीव्ही, सीपीयू, कीबोर्ड, माऊस तसेच अन्य इलेक्ट्रॉनिक साहित्य जप्त करण्यात आले. याप्रकरणी पोलिस हवालदार अशोक कडवळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोन्ही आरोपींविरुद्ध मुंबई जुगार कायद्यान्वये वडगाव निंबाळकर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

### उत्तर भारतीय प्रकोष्ठ अध्यक्षपदी संतोष ओझा यांची नियुक्ती

**पिंपरी चिंचवड** : भारतीय जनता पक्ष पिंपरी-चिंचवड शहर उत्तर भारतीय प्रकोष्ठाच्या अध्यक्षपदी संतोष वशिष्ठ मुनी ओझा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी नियुक्तीपत्र देत ही घोषणा केली.

ओझा यांच्या सामाजिक व संघटनात्मक कार्याची दखल घेऊन त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. पक्षाची विचारधारा व विविध जनकल्याणकारी योजना समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी ते कार्य करतील, असा विश्वास नियुक्तीपत्रात व्यक्त करण्यात आला आहे. या नियुक्तीबद्दल संतोष ओझा यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत असून, उत्तर भारतीय समाज आणि पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी ते प्रयत्नशील राहतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# अखेर ठाकरेंच्या ६ खासदारांचा शिंदेसेनेत प्रवेश

## ऑपरेशन टायगर फुलप्रूफ सक्सेस, एकनाथ शिंदेंची तुफान फटकेबाजी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातून बंडखोरी केलेल्या सहा खासदारांनी सोमवारी अधिकृतपणे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला. या प्रवेशानंतर बोलताना शिंदे यांनी ऑपरेशन टायगर आता फुलप्रूफ सक्सेस झालं आहे अशी घोषणा करत नव्या खासदारांच्या सन्मानाची आणि त्यांच्या मतदारसंघांच्या विकासाची हमी दिली.

यशवंतराव चव्हाण सेंटर येथे झालेल्या कार्यक्रमात ओमराजे निंबाळकर, संजय जाधव, संजय देशमुख, संजय दिना पाटील, नागेश पाटील आष्टीकर आणि भाऊसाहेब वाकचौरे यांनी शिंदे गटात प्रवेश केला.

**'खासदारांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही'**

नव्या खासदारांचे स्वागत करताना एकनाथ शिंदे म्हणाले की, शिवसेनेच्या परिवारात सहा नवीन खासदार सामील झाले आहेत. त्यांचा योग्य तो सन्मान केला जाईल. त्यांच्याकडे कधीही दुर्लक्ष होणार नाही. त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. केंद्र सरकारशी संबंधित प्रश्न असोत किंवा राज्यातील विकासकामे, या खासदारांच्या मतदारसंघातील कोणतेही काम अडवले जाणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी दिली

**शिवसेना आणखी भक्कम होणार'**

या प्रवेशामुळे पक्षाची ताकद आणखी वाढणार असल्याचा दावा करत शिंदे म्हणाले, ही सगळी ताकद एकत्र आल्यानंतर शिवसेना अधिक भक्कम होईल. आम्ही सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्या आहेत.

**प्रत्येक खासदाराचे नाव घेत शिंदेंकडून कौतुक**

भाषणादरम्यान एकनाथ शिंदे यांनी नव्याने प्रवेश केलेल्या सर्व खासदारांचे वैयक्तिकरित्या कौतुक केले. संजय दिना पाटील हे जनतेशी जोडलेले आणि कार्यकर्त्यांचा कैवारी असल्याचे त्यांनी सांगितले. ओमराजे निंबाळकर यांचा उल्लेख करताना, त्यांना काही जणांनी 'रील स्टार' म्हटलं, पण ते 'रिअल स्टार' आहेत, असे शिंदे म्हणाले. संजय देशमुख, नागेश पाटील आष्टीकर आणि भाऊसाहेब वाकचौरे यांच्या कामाचाही त्यांनी गौरव केला.

**'विकासासाठीच निर्णय'**

हे सर्व खासदार केवळ मतदारसंघाच्या विकासासाठी आणि जनतेची कामे करण्यासाठी शिवसेनेत आल्याचे सांगत शिंदे म्हणाले की, त्यांच्या प्रत्येक मतदारसंघातील विकासकामांना गती दिली जाईल आणि अडचणी तत्काळ सोडवल्या जातील.

**२०२२ च्या बंडाचा उल्लेख**

२०२२ मधील शिवसेनेतील बंडाचा उल्लेख करत शिंदे म्हणाले, बाळासाहेबांची विचारधारा वाचवण्यासाठी आम्ही उठाव केला. त्यावेळी आमच्यासोबत आलेले ४० आमदार पुन्हा निवडून येणार नाहीत, असे म्हटले जात होते. पण जनतेने ४० चे ६० आमदार निवडून दिले.

**कार्यकर्त्यांना दिला विश्वास**


शेवटी त्यांनी सांगितले की, मी दिलेला शब्द पाळतो. त्यामुळेच लोक आणि कार्यकर्ते माझ्यावर विश्वास ठेवतात. आता या सहा खासदारांच्या माध्यमातून शिवसेना आणखी मजबूत होईल आणि विकासाची गती वाढेल.

# वाहतूक कोंडीची चिंता मिटली, मलकापुरातील युनिक उड्डाणपुलावरून हलक्या वाहनाच्या वाहतुकीला हिरवा कंदील

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मलकापूर** : पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गाच्या येथील युनिक उड्डाणपुलाच्या वाहतुकीला हिरवा कंदील दाखवला. सातारा-कोल्हापूर लेनवरून मंत्री, खासदारांसह आमदारांच्या वाहनांचे ताफे प्रथम धावले. त्यानंतर कोल्हापूरकडे जाणारी हलकी वाहने सुसाट गेली. या बहुचर्चित उड्डाणपुलाची रविवारी चाचणीचा प्रारंभ खासदार उदयनराजे भोसले, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार डॉ. अतुल भोसले, मनोज घोरपडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गाच्यामलकापूर येथील युनिक उड्डाणपुलाच्या विविध चाचण्या सध्या सुरू केल्या आहेत. काही दिवसांपूर्वीच ३५ टन वजनाच्या १२ गाड्या ठिकठिकाणी २४ तास उभ्या करून लोड टेस्टिंग करण्यात आले. सातारा-कोल्हापूर लेनचे काम बहुतांशी पूर्ण झाले असल्याने या लेनवरून हलक्या वाहनाची वाहतूक सुरू करून चाचणी करण्याचा निर्णय महामार्ग प्राधिकरणसह अदानी व डीपी जैनच्या अधिकाऱ्यांनी घेतला होता.



या चाचणीचा प्रारंभ रविवार, खासदार उदयनराजे भोसले, बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले भोसले, आमदार डॉ. अतुल भोसले यांच्या उपस्थितीत केला. सातारा-कोल्हापूर लेनवरून मंत्री, खासदारांसह आमदारांच्या वाहनांचे ताफे प्रथम धावले. त्यानंतर कोल्हापूरकडे जाणारी हलकी वाहने या उड्डाण पुलावरून सोडण्यात आली. सुरक्षेच्या कारणास्तव सकाळी नऊ ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत या लेनवरून हलकी वाहने धावणार आहेत.

यावेळी माजी आमदार आनंदराव पाटील, धैर्यशील कदम, मलकापूरचे नगराध्यक्ष तेजस सोनावले, जिल्हा परिषद उपाध्यक्ष राजू भोसले, महामार्ग प्राधिकरणचे प्रकल्प संचालक संजय कदम, अदानी व डीपी जैन कंपनीचे अधिकार व कर्मचारी उपस्थित होते.

**कराडसह मलकापूरच्या वाहतूक व्यवस्थेला नवी दिशा**

पहिल्या टप्प्यातील वाहतूक सुरू झाल्यानंतर परिसरातील नागरिक, व्यापारी आणि महामार्गावरील प्रवाशांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर सुरू झालेला हा उड्डाणपूल कराड व मलकापूरच्या वाहतूक व्यवस्थेला नवी दिशा देणारा ठरणार आहे. महामार्गावरील प्रवासाला नव्या गतीची जोड मिळणार असल्याची भावना नागरिक, वाहनधारक, प्रवाशांकडून व्यक्त होत आहे.

## पुन्हा रंगणार भारतात एफ-१ चा थरार! १३ वर्षांनंतर सरकारचा पुढाकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : तब्बल १३ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर भारतात पुन्हा एकदा फॉर्म्युला-१ (F1) इंडियन ग्रँड प्रिक्स आयोजित करण्यासाठी केंद्र सरकारने हालचाली सुरू केल्या आहेत. २०२८ पर्यंत भारतात पुन्हा ऋ१ स्पर्धा भरवण्याच्या उद्देशाने क्रीडा मंत्रालयाने मोटरस्पोर्टशी संबंधित संस्था, विद्यमान आणि माजी रेस ड्रायव्हर्स तसेच अन्य संघटनांसोबत महत्त्वपूर्ण बैठक घेतली आहे.

बैठकीत भारतात F1 स्पर्धा पुन्हा आयोजित करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, आर्थिक व्यवहार्यता, तांत्रिक क्षमता आणि आयोजनाची तयारी यावर सविस्तर चर्चा झाली. यासाठी स्वतंत्र टास्क फोर्स स्थापन करण्यात येणार असून ही समिती संपूर्ण प्रकल्पाचा सविस्तर अहवाल तयार करणार आहे. भारतात यापूर्वी २०११ ते २०१३ या कालावधीत उत्तर प्रदेशातील बुद्ध इंटरनॅशनल सर्किट येथे इंडियन ग्रँड प्रिक्सचे आयोजन करण्यात आले होते. मात्र करासंबंधी वाद, वाढलेला खर्च आणि प्रशासकीय अडचणींमुळे २०१३ नंतर ही स्पर्धा बंद झाली. आता त्या अडचणी दूर करून भारताला पुन्हा जागतिक मोटरस्पोर्टच्या नकाशावर आणण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. फॉर्म्युला-१ चे मुख्य कार्यकारी अधिकारी स्टेफानो दोमेनिकाली यांनीही भारताला F1 साठी महत्त्वाची बाजारपेठ असल्याचे सांगत, योग्य भागीदार आणि अनुकूल परिस्थिती मिळाल्यास भारतात पुनरागमन करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्यामुळे भारतीय चाहत्यांच्या आशा अधिक बळावल्या आहेत.

# मोरोक्कोने रचला इतिहास ! इटली आणि अर्जेंटिनाला मागे टाकत नावावर केला मोठा विक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**टोरांटो** : फिफा फुटबॉल विश्वचषक २०२६ मध्ये मोरोक्कोने इतिहासाच्या सुवर्ण पानांवर आपले नाव कोरले आहे. ३९ सामन्यांमध्ये अपराजित राहून, त्यांनी इटलीची ३७ सामन्यांची आणि अर्जेंटिनाची ३६ सामन्यांची विजयी मालिका मागे टाकली आहे.

चार वर्षांपूर्वी, उपांत्य फेरी गाठून मोरोक्कोने मोठ्या संघांना आव्हान देण्याची आपली तयारी दर्शवली होती. यामुळे आता मोरक्कोचा संघ भक्कम खेळाडूंचा असल्याचे मानले जात आहे. इटली आणि अर्जेंटिनाच्या विजयी मालिकेवर मात करणे ही काही सामान्य कामगिरी नाही. हे दोन्ही संघ अनेक वर्षांपासून फुटबॉलमधील महासत्ता आहेत. इटलीची ३७ सामन्यांची अपराजित मालिका एकेकाळी आधुनिक फुटबॉलमधील एक मापदंड मानली जात होती, तर अर्जेंटिनाची ३६ सामन्यांची विजयी मालिका त्यांच्या विश्वचषक-विजयी मोहिमेतील एक महत्त्वाचा घटक होती. आता, मोरोक्कोने या दोन्ही देशांना मागे टाकले आहे, आणि हे सिद्ध केले आहे की फुटबॉल आता दुर्लक्षित करण्यासारखी शक्ती राहिलेली नाही. मोरोक्कोच्या या यशाच्या केंद्रस्थानी एक बचावात्मक संघ आहे, ज्याने आधुनिक फुटबॉलमध्ये सामर्थ्य आणि लवचिकतेची एक नवीन व्याख्या दिली आहे. कतारमधील २०२२ च्या फिफा विश्वचषकापासून ते अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिकोमधील २०२६ च्या स्पर्धांपर्यंत त्यांनी कसून सराव करत आज हे यश प्राप्त केले आहे.

अश्रफ हकिमी, नायेफ अगेर्ड आणि गोलरक्षक यासीन बोनू यांसारख्या प्रमुख खेळाडूंच्या नेतृत्वाखाली, मोरोक्कोचा बचाव आज फुटबॉलमधील सर्वात विश्वासार्ह विभागांपैकी एक बनला आहे. वालिद रेगरागुई यांच्या मार्गदर्शनाखाली मोरोक्कोची ओळख स्पष्ट झाली आहे. हा एक असा संघ आहे जो दबाव आणि कठीण परिस्थितीला तोंड देऊ शकतो.

# दुष्काळात तेरावा महिना! फर्ग्युसन आणि निलायमजवळ जलवाहिनी फुटली; हजारो लीटर पाणी रस्त्यावर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : दिवसाआड पाणीपुरवठा सुरू झाल्याने पुणेकर त्रासलेले असतानाच शहरात दोन ठिकाणी मोठ्या प्रमाणावर जलवाहिनीतून गळती होऊन पाणी वाया गेले. पहिल्या घटनेत फर्गसन महाविद्यालया समोरील मुख्य जलवाहिनी फुटल्याने शनिवारी सकाळी हजारो लीटर पाणी वाया गेले. विशेष म्हणजे, या जलवाहिनी गळत असल्याचे प्रशासनाच्या दोन दिवस आधीच निदर्शनास आले होते.

त्यानंतर दुरूस्तीऐवजी केवळ खोदाई करून ही जलवाहिनी तशीच ठेवली. शनिवारी सकाळी तिच्यावर पाण्याचा दाब आल्याने ती फुटल्याने मोठया प्रमाणात पाणी वाया गेले. नागरिकांनी महापालिकेस ही माहिती कळविल्यानंतर जलवाहिनीचा मुख्य व्हॉल्व बंद केला. नंतर पाणी पुरवठाही बंद केला. सकाळच्या वेळेत हा प्रकार घडल्याने मुख्य रस्त्यावरून मोठ्या प्रमाणावर पाणी वाहत होते. त्यामुळे तेथे वाहतूक कोंडीही झाली. एवढ्या



मोठया प्रमाणावर पाणी वाया गेल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. पाणी कपात सुरू असताना अशा प्रकारे पाणी वाया जाणार नाही याची पालिकेने खबरदारी घ्यावी अशी मागणी होत आहे. पर्वती जलकेंद्रातून शहराच्या मध्यवर्ती पेठांना पाणी पुरवठा केल्या जाणाऱ्या मुख्य जलवाहिनीच्या व्हॉल्वलाही गेल्या दोन दिवसांपासून गळती सुरू असल्याने शेकडो लीटर पाणी वाय जात आहे.

निलायम चित्रपटगृहाच्या जवळ आंबील ओढ्याच्या बाजूने ही जलवाहिनी असून त्यावर असलेला एअर व्हॉल्व मागील दोन दिवसांपासून गळत असल्याने तेथून पाणी वाया जात आहे.

शहरातील अनेक नागरिकांनी ही माहिती पालिकेच्या पाणी पुरवठा विभागास दिली असली तरी प्रशासनाने त्याकडे लक्ष दिलेले नाही. त्यामुळे ऐन पाणी टंचाईच्या संकटात वाया जाणाऱ्या पाण्याला जबाबदार कोण असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

## आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शहरात १४ ठिकाणी योग शिबिरे

### भाजयुमोचा 'निरोगी युवा – सशक्त भारत' संदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी - चिंचवड** : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने शहरातील १४ ठिकाणी भव्य योग शिबिरांचे आयोजन करण्यात आले.

यमनानगर-तळवडे, आकुर्डी-शाहूनगर, भोसरी-कृष्णानगर, संत तुकाराम नगर, वाकड-थेरगाव, रहाटणी-पिंपळे सौदागर, दिघी-भोसरी, चिंचवड-काळेवाडी, चिंचवड प्राधिकरण, मोशी-चऱ्होली, इंद्रायणीनगर-नेहरूनगर, पिंपरी-फुगेवाडी-बोपखेल, सांगवी-पिंपळे गुरव आणि रावेत-वाल्हेकरवाडी येथे एकाच वेळी योग दिन कार्यक्रम पार पडले. या उपक्रमात युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. योगाच्या माध्यमातून निरोगी जीवनशैली, मानसिक स्वास्थ्य आणि शारीरिक तंदुरुस्तीचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी भाजयुमो शहराध्यक्ष दिनेश लालचंद यादव यांनी योग ही भारताची जगाला दिलेली अमूल्य देणगी असल्याचे सांगत प्रत्येकाने योगाचा दैनंदिन जीवनात समावेश करण्याचे आवाहन केले.

# अडीच वर्षांच्या चिमुकलीला नागाचा दंश; शरीर थंड, हृदयाचे ठोके बंद, डॉक्टरांनी आणले मृत्यूच्या दाढेतून सुखरूप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नारायणगाव** : अवघ्या अडीच वर्षांच्या आर्या भालेराव या चिमुकलीने विषारी नागाच्या दंशानंतर मृत्यूच्या दाढेतून सुखरूप परत येत जीवनावर पुन्हा हक्क मिळवला आहे. कुटुंबीयांची कमालीची तत्परता आणि नारायणगाव येथील विघ्नहर नर्सिंग होमचे डॉ. सदानंद राऊत व डॉ. सौ. पल्लवी राऊत यांच्या अथक व कौतुकास्पद प्रयत्नांमुळे हा वैद्यकीय चमत्कार घडून आला आहे.

गुरुवारी ( दि.१८) दुपारी १२.४५ वाजताच्या सुमारास ही काळजाचा थरकाप उडवणारी घटना घडली. आर्या आपल्या वडिलांसोबत जमिनीवर झोपली असताना अचानक जोरजोरात ओरडू लागली. वडिलांनी पाहिले असता जवळच एक विषारी नाग होता, ज्याने मुलीच्या उजव्या हाताला दंश केला होता. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून कुटुंबीयांनी अजिबात वेळ न घालवता तिला तातडीने रुग्णालयात नेले. सर्पदंशानंतर अवघ्या ४५ मिनिटांत ती रुग्णालयात दाखल झाली.

रुग्णालयात पोहोचेपर्यंत आर्याची प्रकृती कमालीची खालावली होती. तिला गुंगी येत होती, बोलता येत नव्हते आणि उलट्या सुरू झाल्या होत्या. रुग्णालयात पाऊल ठेवताच तिची अवस्था अत्यंत चिंताजनक बनली. हृदय आणि श्वसनक्रिया पूर्णपणे बंद झाली होती. शरीर थंड पडले होते, नाडी आणि हृदयाचे ठोके लागत नव्हते, तर डोळ्यांच्या बाहुल्या स्थिर झाल्या होत्या.

अशा कठीण प्रसंगी क्षणाचाही विलंब न करता डॉ. सदानंद राऊत आणि डॉ. पल्लवी राऊत यांनी तातडीने सीपीआर (उझठ) सुरू केला. आर्याला व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले. पुढील दीड तासात तिला तब्बल तीन वेळा हृदयविकाराचा झटका (उरअॅवळरल अअॅअॅशीीं) आला, मात्र डॉक्टरांच्या जिद्दीपुढे मृत्यूलाही मागे हटावे लागले. प्रत्येक वेळी डॉक्टरांनी तिचे हृदय पुन्हा सुरू करण्यात यश मिळवले.

या जीवन-मृत्यूच्या थरारक लढाईत डॉ. ऋचा मते, डॉ. अजय मते, डॉ. योगेश पाटील आणि नर्सिंग होमच्या सर्व कर्मचाऱ्यांनी खांद्याला खांदा लावून काम केले. आपत्कालीन उपचारांसोबतच अवघ्या २० ते ३० मिनिटांत चिमुकलीला ३० अँटी-स्नेक व्हेनम (अडत) इंजेक्शन्स देण्यात आली. सायंकाळपर्यंत चिमुकलीच्या पापण्यांची आणि जिभेची हालचाल सुरू झाली आणि विषाचा प्रभाव कमी होत असल्याचे संकेत मिळाले.

**अवघ्या २४ तासांत मृत्यूला चकवा**

डॉक्टरांचे प्रयत्न आणि चिमुकलीच्या जगण्याच्या जिद्दीमुळे अवघ्या २४ तासांत तिची प्रकृती आश्चर्यकारकरित्या सुधारली. ती पूर्ण शुद्धीत आली असून तिने हातपाय हलवण्यास सुरुवात केली आहे. तिला यशस्वीरित्या व्हेंटिलेटरवरूनही काढण्यात आले आहे. सध्या तिची प्रकृती स्थिर असून उलटीमुळे फुफ्फुसात अन्न गेल्याने झालेल्या अॅस्पिरेशन न्यूमोनियावर आणि हाताच्या सुजेवर उपचार सुरू आहेत. तिची न्यूरोलॉजिकल सुधारणा अत्यंत समाधानकारक आहे.

सर्पदंशानंतर कोणतीही अंधश्रद्धा न बाळगता तातडीने रुग्णालयात पोहोचणे हाच जीव वाचवण्याचा एकमेव मार्ग आहे. योग्य वेळी मिळालेले अँटी-स्नेक व्हेनम आणि कृत्रिम श्वसन यंत्रणा (व्हेंटिलेटर) गंभीर रुग्णालाही बरे करू शकते , अशी माहिती डॉ सदानंद राऊत यांनी दिली.

## राष्ट्रवादीच्या त्या नगरसेवकाचे जात प्रमाणपत्र अवैध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तळेगाव दाभाडे** : तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक १० 'अ' मधील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचे नगरसेवक मजनू ऊर्फ मदन हनुमंत नाटेकर यांचे जात प्रमाणपत्र जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने अवैध ठरविले आहे. ही माहिती तक्रारदार तथा जमीन हक्क परिषदेच्या राज्याध्यक्ष करुणा प्रकाश सरोदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सरोदे यांनी सांगितले की, नाटेकर यांनी अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या प्रभागातून निवडणूक लढविली होती. त्यांनी महार समाजाचे जात प्रमाणपत्र बेकायदेशीर कागदपत्रांच्या आधारे मिळविल्याचा आरोप करण्यात आला होता. याबाबत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे तक्रार दाखल करण्यात आली होती.

समितीचे अध्यक्ष अमोल यादव, सदस्य सचिव शिवकांत चिकुर्ते आणि सदस्य संजय दाणे यांनी दिलेल्या निर्णयानुसार नाटेकर यांचा महार जातीचा दावा अमान्य करण्यात आला असून त्यांचे जात प्रमाणपत्र रद्द करण्यात आले आहे. या निर्णयामुळे स्थानिक राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.